नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामधील प्रकल्पामधील राज्यशासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांना वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१७/प्र.क्र.१०५/नवि-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१८.

पहा :-

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक ३० जानेवारी,२०१४.
(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. एमआरडी-३३१७/प्र.क्र.१८(महा-मेट्रो)/नवि-७ दिनांक ३१ मार्च,२०१७
(३) वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७.
(४) नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक बीयुडी-२०१७/प्र.क्र.५०/नवि-४, दिनांक २५ एप्रिल,२०१७.

प्रस्तावना :

नागपूर रेल्वे प्रकल्पास राज्यशासनाने नगर विकास विभाग शासन निर्णय, क्र.नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पास केंद्रशासनाने क्रमांक K-१४०११/१(N-१)/२०१४-MRTS-III, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनीची स्थापन करण्यात आली होती. नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. चे जानेवारी, २०१७ मध्ये महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. मध्ये परिवर्तन झाले आहे. सदर विशेष हेतू वहन कंपनीमध्ये केद्र व राज्यशासनाचा ५०:५० असा सहभाग आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा गुंतवणूक/समभाग (Equity) व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरुपात रहाणार आहे. तसेच या प्रकल्पात नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांचे अनुदान देखिल उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पासाठी वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घ्यावयाचे असून हे कर्ज सहाय्य केंद्र शासनामार्फत घेतले जाणार आहे. अशा प्रकारच्या सर्व निधी हा सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनीकडे सुपूर्द करावयाचा आहे. कर्जाची परतफेड या विशेष हेतू वहन कंपनीने करावयाची आहे.

२. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास राज्य शासनाकडून २०% आर्थिक सहाय्यास दिनांक ३० जानेवारी २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तद्नंतर केंद्रशासनाने सदर प्रकल्प दिनांक २१.८.२०१४ च्या पत्रान्वये मंजूर केला असून त्यानुसार नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी प्रकल्प पूर्णत्वासाठी लागणारा एकूण रु.८६८० कोटी निधी मध्ये राज्यशासनाच्यावतीने समभाग

म्हणून एकूण रु.१११४ कोटी व केंद्रीय कराच्या ५०% रक्कम रु.४४१ कोटी आणि राज्यस्तरीय करांसाठी रु.१८१ कोटी मिळून एकूण रु.६२२ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहे.

३. सन २०१६-१७ या वर्षात नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता रु. २६.२१ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या कंपनीस राज्य शासनाकडून तूर्त स्वरुपात बिनव्याजी दुय्यम कर्ज म्हणून वितरीत करण्यात आले आहे (परिशिष्ठ-१). आता, सन २०१७-१८ या वर्षामध्ये सदर प्रयोजनासाठी रु. ६० कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आले आहेत. उक्त तरतूदीमधून रु. ६० कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. या कंपनीस राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज म्हणून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> -

१. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज म्हणून रु.६०,००,००,०००/- (अक्षरी रुपये साठ कोटी फक्त) इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांना प्रदान करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रक्कम " मागणी क्र. एफ-७, ६२१७- नगर विकासासाठी कर्जे , ८०- सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे राज्य योजना, (००) (०२) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी दुय्यम ऋण (राज्य) ५५ - कर्जे व आगाऊ रक्कमा सांकेतांक क्रमांक (६२१७०७८८) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची घालण्यात यावी.

३. उपरोक्त लेखाशीर्ष उपयोगात आणण्यासाठी नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी, नवि-५, यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. शासन निर्णयातील परिच्छेद -१ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून काढून ती महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यास देण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. नगर विकास विभागाच्या रोख शाखेने देयक तयार करुन ते अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे पाठवावे. याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही नवि- ३१ कार्यासनाने करावी.

४. राज्यशासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य म्हणून वितरीत केलेल्या उपरोक्त रु.६० कोटीचा विनियोग नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला केंद्रीय/ राज्यस्तरीय करापोटी येणाऱ्या खर्चासाठी करावयाचा आहे.

५. राज्यशासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य म्हणून वितरीत उपरोक्त रक्कम रु. ६० कोटी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून सदर प्रकल्पासाठी बाह्य वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर वसूल करावयाची आहे.

६. सदर कर्ज सहाय्याची रक्कम सदर प्रकल्पाचे मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर एका हप्त्यात करण्यात यावी.

७. सदर दुय्यम कर्जावरील व्याजाबाबत वित्त विभागाकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करुन निर्णय घेण्यात येईल. भविष्यात या कर्जावर व्याज अदा करावयाचे झाल्यास त्याची वसूली महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्याकडून करण्यात येईल, या अटीवर महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना वितरीत करावयाचे दुय्यम कर्ज रु.६० कोटी हे तुर्त बिनव्याजी कर्ज म्हणून वितरीत करण्यात येत आहे.

८. नागपूर मेट्रो रेल्वे या प्रकल्पाकरिता राज्यशासनाकडून केंद्रीय व राज्यस्तरीय करापोटी येणाऱ्या खर्चासाठी प्राप्त झालेली रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडे जमा झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

९. सदर रक्कम वितरीत झाल्यानंतर या रक्कमेतून खर्च केलेल्या रक्कमांचा तपशिल नागपूर सुधार प्रन्यास/राज्य शासन /केंद्रशासन यांना सादर करण्यात यावा.

१०. सदर प्रकल्पासाठी केंद्रशासन/राज्यशासन/नागपूर सुधार प्रन्यास/नागपूर महानगरपालिका इ. कडून तसेच राज्यशासनामार्फत केंद्रीय/ करापोटी येणाऱ्या खर्चासाठी प्राप्त होणाऱ्या रक्कमांसाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी स्वतंत्र लेखे ठेवावेत.

११. राज्यशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सदर कर्जसहाय्यासाठी राज्यशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कर्जा विषयीच्या इतर संबंधीत अटी व शर्ती लागू राहतील.

१२. नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी प्राप्त होणाऱ्या निधीबाबत राज्य शासनाच्यावतीने सभापती, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी स्वतंत्र लेखे ठेवावेत व वितरीत झालेल्या निधीचे संनियंत्रण करावे.

१३. सदर रक्कम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केली आहे ती त्याच प्रयोजनासाठी खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांचे मार्फत सादर करावे.

१४. सदर कर्ज सहाय्याचा वितरणाबाबत शादिक-२०१२/प्र.क्र.४९/ऋण व हमी दिनांक ३०/१२/२०१४ मधील सूचनानुसार महाऋण आज्ञावलीत माहीती भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

१५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद क्रमांक ७ ते १८ मधील सर्व अटींची तसेच सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्टामधील अनुक्रमांक १ ते ८ मधील सर्व अटींची पूर्तता होत आहे.

१६. राज्य शासनाकडून नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता आतापर्यंत रु. २६.२१ कोटी इतका निधी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून वितरीत करण्यात आला आहे. सदर आदेशान्वये वितरीत होणाऱ्या निधीनंतर एकूण वितरीत निधीची परिस्थिती खालील प्रमाणे :-

अनु.क्र.	**दिनांक**	**रक्कम (रु. कोटी)**	**निधी वितरीत करणाऱ्या संस्थेचे नाव**	**एकूण वितरीत निधी (रु. कोटी)**
१	३१.०३.२०१७	२६.२१	राज्य शासन	२६.२१
२	सदरचे वितरण	६०.००	राज्य शासन	८६.२१

१७. सदर निधी वितरण आदेश वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ६४/अर्थ-१६, दिनांक २७ मार्च, २०१८ नुसार मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

१८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या सांकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३२८११४३४३८९२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.04.02 18:16:20 +05'30'

(वि.श्री. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
४. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर
५. आयुक्त नागपूर महानगर पालिका, नागपूर
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. नागपूर
७. महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
८. निवासी अधिदान व लेखा अधिकारी, (लेखा परीक्षा), मुंबई.
९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ३२ .
१०. अधिदान व लेखाधिकारी मुंबई
११. वित्त विभाग (व्यय-३), अर्थसंकल्प-१६, अर्थसंकल्प-३.
१२. नियोजन विभाग (कार्यासन १४४४)
१३. उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई
१४. कक्ष अधिकारी नवि-४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ .
१५. रोख शाखा (५ प्रती),
१६. निवड नस्ती, नवि-७.

परिशिष्ट -१

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामधील प्रकल्पामधील राज्यशासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांना वितरित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक क्रमांक : एमआरडी-३३१७/प्र.क्र.१८(महा-मेट्रो)/नवि-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ मार्च, २०१७.

पहा :-

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक ३० जानेवारी,२०१४.
(२) वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१६/प्र.क्र.८३/अर्थ/३, दिनांक २० एप्रिल, २०१६.
(३) नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक बीयुडी-.२०१६/प्र.क्र.६२/नवि-४, दिनांक २८ जून, २०१६.

प्रस्तावना : नागपूर रेल्वे प्रकल्पास राज्यशासनाने नगर विकास विभाग शासन निर्णय, क्र.नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक ३० जानेवारी, २०१४ अन्वये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पास केंद्रशासनाने क्रमांक K-१४०११/१(N-१)/२०१४-MRTS-III, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ दिनांक २१.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनी स्थापन करण्यात आली होती. नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. चे जानेवारी, २०१७ मध्ये महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. मध्ये परिवर्तन झाले आहे. सदर विशेष हेतू वहन कंपनीमध्ये केद्र व राज्यशासनाचा ५०:५० असा सहभाग आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा गुंतवणूक/समभाग (Equity) व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरुपात रहाणार आहे. तसेच या प्रकल्पात नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांचे अनुदान देखिल उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पासाठी वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घ्यावयाचे असून हे कर्ज सहाय्य केंद्र शासनामार्फत घेतले जाणार आहे. अशा प्रकारच्या सर्व निधी हा सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनीकडे सुपूर्द करावयाचा आहे. कर्जाची परतफेड या विशेष हेतू वहन कंपनीने करावयाची आहे.

२.० नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास राज्य शासनाकडून २०% आर्थिक सहाय्यास दिनांक ३० जानेवारी २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तद्नंतर केंद्रशासनाने सदर प्रकल्प दिनांक २१.८.२०१४ च्या पत्रान्वये मंजूर केला असून त्यानुसार नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी प्रकल्प पूर्णत्वासाठी लागणारा एकूण रु ८६८० कोटी निधी मध्ये राज्यशासनाच्यावतीने समभाग म्हणून एकूण रु.१११४ कोटी व केंद्रीय कराच्या ५०% रक्कम रु.४४१ कोटी आणि राज्यस्तरीय करांसाठी रु.१८१ कोटी मिळून एकूण रु.६२२ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे.

३.० सन २०१६-१७ या वर्षाकरिता नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य सदर प्रयोजनासाठी रु. २६.२१ कोटी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली असून सदर रु. २६.२१ कोटी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. या कंपनीस राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज म्हणून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज म्हणून रु.२६,२१,००,०००/- (अक्षरी रुपये सव्वीस कोटी एकवीस लाख फक्त) इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांना प्रदान करण्यास या शासन निर्णयाव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रक्कम " मागणी क्र. एफ-७ ६२१७- नगर विकासासाठी कर्जे , ८०, सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे राज्य योजना, (००) (०७) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता राज्य शासनाचे दुय्यम कर्ज ५५ - कर्जे व आगाऊ रक्कमा सांकेतांक क्रमांक (६२१७०७८८) या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची घालण्यात यावी.

३. उपरोक्त लेखाशीर्ष उपयोगात आणण्यासाठी नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी, नवि-५, यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. शासन निर्णयातील परिच्छेद -१ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून काढून ती महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यास देण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. नगर विकास विभागाच्या रोख शाखेने देयक तयार करुन ते अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे पाठवावे. याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही नवि- ३१ कार्यासनाने करावी.

४. राज्यशासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य म्हणून वितरीत केलेल्या उपरोक्त रु.२६.२१ कोटी चा विनियोग नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला केंद्रीय/ राज्यस्तरी करापोटी येणाऱ्या खर्चासाठी करावयाचा आहे.

५. राज्यशासनाकडून दुय्यम कर्जसहाय्य म्हणून वितरीत उपरोक्त रक्कम रु.२६.२१ कोटी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड कडून दुय्यम कर्ज म्हणून सदर प्रकल्पासाठी बाह्य वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर वसूल करावयाची आहे.

६. सदर कर्ज सहाय्याची रक्कम सदर प्रकल्पाचे मुख्य कर्जाची परफेड केल्यानंतर एका हप्त्यात करण्यात यावी.

७. सदर दुययम कर्जावरील व्याजाबाबत वित्त विभागाकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करुन निर्णय घेण्यात येईल. भविष्यात या कर्जावर व्याज अदा करावयाचे झाल्यास त्याची वसूली महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्याकडून करण्यात येईल, या अटीवर महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना वितरीत करावयाचे दुययम कर्ज रु.२६.२१ कोटी हे तुर्त बिनव्याजी कर्ज म्हणून वितरीत करण्यात येत आहे.

८. नागपूर मेट्रो रेल्वे या प्रकल्पाकरिता राज्यशासनाकडून केंद्रीय व राज्यस्तरीय करापोटी येणाऱ्या खर्चासाठी प्राप्त झालेली रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडे जमा झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

९. सदर रक्कम वितरीत झाल्यानंतर या रक्कमेतून खर्च केलेल्या रक्कमांचा तपशिल नागपूर सुधार प्रन्यास/राज्य शासन /केंद्रशासन यांना सादर करण्यात यावा.

१०. सदर प्रकल्पासाठी केंद्रशासन/राज्यशासन/नागपूर सुधार प्रन्यास/ नागपूर महानगरपालिका इ. कडून तसेच राज्यशासनामार्फत केंद्रीय/ करापोटी येणाऱ्या खर्चासाठी प्राप्त प्राप्त होणाऱ्या रक्कमांसाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी स्वतंत्र लेखे ठेवावेत.

११. राज्यशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सदर कर्जसहाय्यासाठी राज्यशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कर्जा विषयीच्या इतर संबंधीत अटी व शर्ती लागू राहतील.

१२. नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी प्राप्त होणाऱ्या निधीबाबत राज्य शासनाच्या वतीने सभापती, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी स्वतंत्र लेखे ठेवावेत व वितरीत झालेल्या निधीचे संनियंत्रण करावे.

१३. सदर रक्कम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केली आहे ती त्याच प्रयोजनासाठी खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांचे मार्फत सादर करावे.

१४. सदर कर्ज सहाय्याचा वितरणाबाबत शादिक-२०१९/प्र.क्र.४९/ऋण व हमी दिनांक ३०/१२/२०१४ मधील सूचनानुसार महाऋण आज्ञावलीत माहीती भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

१५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९ /अर्थ-३, दिनांक २०.०४.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ७ ते १८ मधील सर्व अटींची तसेच सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्ट मधील अनुक्रमांक ०३ व ०९ मधील सर्व अटींची पूर्तता होत आहे.

१६. सदर निधी वितरण आदेश वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१२५/व्यय-३, दिनांक ३१ मार्च २०१७ नुसार मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[वि.श्री. पाटील]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
आयुक्त पुणे महानगरपालिका, पुणे
आयुक्त, पिपंरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर
आयुक्त नागपूर महानगर पालिका, नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. नागपूर
महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
निवासी अधिदान व लेखा अधिकारी, (लेखा परीक्षा), मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ३२ .
अधिदान व लेखाधिकारी मुंबई
वित्त विभाग (व्यय-३), अर्थसंकल्प-१६, अर्थसंकल्प-३.
नियोजन विभाग (कार्यासन १४४४)
उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई
कक्ष अधिकारी नवि-४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ .
रोख शाखा (५ प्रती),
निवड नस्ती, नवि-७.